2021-22

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905

SIDDHI
Siddhi Prakashan

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

A Peer Reviewed - Referred
Belanagar, Near Maroti Mandir, Taroda (Kh.) Nanded - 431605 (Maharashtra, India)

## Certificate of Publication

Indexed SJIF

Impact Factor 7.479

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper / Article titled ऑनलाईन-ऑफलाईन संमिश्र शिक्षण पद्धतीचे सहअस्तित्व : काळाची गरज of Dr./Mr./Miss/Mrs. भगवान [illegible] शिंदे

It is peer reviewed and published in the issue ___ Vol. ___ in the month of ______

Thank you.

Pallavi

Editor in Chief
Pallavi L. Shete

ISSN 2454-7905
9 772454 790004

# ऑनलाईन – ऑफ लाईन संमिश्र शिक्षण पद्धतीचे सहअस्तित्व : काळाची गरज

प्रा. बी. एस. निकम
सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग, म.स.गा.कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प,
मालेगाव ता. मालेगाव जि. नाशिक

**प्रस्तावना:-**

जेव्हा पासून मानवी संस्कृतीचा उदय झाला तेव्हा पासून भारतीय शिक्षण व्यवस्था आपल्या वैविध्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण गुणवैशिष्ट्ये यांसाठी जगभर प्रसिद्ध आहे. याचाच अर्थ असा की, भारतीय शिक्षणाचा इतिहास हा भारतीय संस्कृतीचा ही इतिहास आहे. काळाच्या ओघात भारतीय समाजात होत असलेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, विकासाच्या आणि बदलांच्या चौकटीत शिक्षणाचे स्थान आणि भूमिका ही सतत विकसित होत आहेत. प्राचीन भारतात उदयास आलेली शिक्षण व्यवस्था तत्कालिन-समकालीन जगाच्या शिक्षण व्यवस्थां पेक्षा प्रगत आणि उत्कृष्ट होती. अनेक देश-विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी भारतात येत होते ते फक्त आणि फक्त येथील गुणवत्ते मुळेच..!! भारतीय शिक्षण व्यवस्थेला तिच्या संक्रमण काळात अनेक आव्हाने आणि समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. आजही ही आव्हाने आणि समस्या आपल्या समोर 'आ' वासून उभी आहेत, त्यांचा सामना आपल्याला एकमेकांशी करायचा आहे.

**शरीराला श्रमाकडे**
**बुद्धीला मनाकडे**
**आणि हृदयाला भावनेकडे**
**वळवणे म्हणजे खरे शिक्षण होय.**

असं म्हटलं जातं. म्हणजेच शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. ज्याद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे व त्याला समाजातील एक जबाबदार नागरिक म्हणून घडविले जाते. हेच महत्त्वाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे कार्य भारतीय शिक्षण व्यवस्था देशातील शाळा महाविद्याल यामार्फत करताना दिसते.

**उद्देश:-**

1. कोरोना महामारीचा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे.
2. कोरोना महामारी मुळे अध्ययन व अध्यापन पद्धतीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
3. ऑनलाइन शिक्षण पद्धती महामारीच्या काळात कशी उपयोगात येते त्याचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलन:-**

प्रस्तुत संशोधन लेख हा प्रामुख्याने दुय्यम व प्राथमिक साधन सामग्रीवर आधारित आहे. दुय्यम साधन सामुग्रीत प्रामुख्याने विविध मासिके, शासकीय बातम्या, शासकीय संकेतस्थळे तसेच वर्तमान पत्रातील लेख यांच्या साह्याने तथ्य संकलन केले आहे. प्राथमिक साधन सामुग्रीत प्रामुख्याने शाळा व महाविद्यालयीन शिक्षण घेणारे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्याशी चर्चा करून संशोधन लेखाशी संबंधित माहिती संकलित केलेली आहे. प्राप्त माहितीच्या स्पष्टीकरणासाठी निबंधात्मक विश्लेषण तंत्राचा अवलंब केलेला आहे.

ISSN – 2454 - 7905
Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred)

विश्लेषण:-

पारंपारिक आणि ऑनलाइन शिक्षणाचे मिश्रण काळाची गरज :-

गेल्या दोन वर्षांचा कालखंड विचारात घेता, जागतिक तसेच भारतीय शिक्षण व्यवस्थेवर कोरोना (कोविड-19) साथीच्या काळात जबरदस्त आघात झालेला आपल्याला बघायला मिळाला. जागतिक तसेच भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या इतिहासात 2020 हे वर्ष भयंकर हा हाकार माजविणारे ठरले. या साथीने संपूर्ण जगाला एखाद्या महाकाय अजगरासारखे आपल्या विळख्यात घेऊन गिळंकृत करत आहे. असं कोणतं ही क्षेत्र अपवाद म्हणता येणार नाही की ज्याच्या वर कोरोनाचा प्रादुर्भाव दिसून आला नाही. संपूर्ण जग यावेळी त्यातून सुटण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. यात लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला. पण सर्वात जास्त हानी याकाळात शिक्षण व्यवस्थेची/ शिक्षण क्षेत्राची झाली. कोरोना विषाणूची साथ हे दुसऱ्या महायुद्धा नंतरचे जगा समोरचे सर्वात मोठे संकट आहे. त्याची व्यापकता विचारात घेता, जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात कोरोनाने कमी जास्त प्रमाणात आपले थैमान मांडले आहे. मानवी जीवनाच्या सर्वच बाजूंवर या संकटाने प्रभाव टाकला आहे. शिक्षण क्षेत्रात झालेली ही हानी भरून काढण्यासाठी पुढील कित्येक वर्ष आपल्याला खर्ची करावे लागणार आहेत. युनेस्कोच्या एका अहवाला नुसार एप्रिल 2020 मध्ये 188 देशात तब्बल 154 कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात 15 लाख शाळा बंद आहेत व त्यांमुळे जवळपास 26 कोटी विद्यार्थीव 89 लाख शिक्षक घरी बसून आहेत. उच्च शिक्षणाचा विचार करता उच्चशिक्षण देणाऱ्या 50 हजार शिक्षण संस्था बंद आहेत व जवळपास 3.7 कोटी विद्यार्थी व 15 लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसून आहेत. तीस कोटी तरुण विद्यार्थी घरी बसणे ही खूप मोठी समस्या आहे. आज रोजी कोविड-19 विषाणू / कोरोना ही फक्त आरोग्य विषयक समस्या न राहता ती शैक्षणिक समस्यांची ही बाजू आहे हे विसरून चालणार नाही.

मार्च 2020 मध्ये कोरोनाच्या वाढत्या आणि जीवघेण्या प्रादुर्भावामुळे आणि 22 मार्च 2020 रोजी लावण्यात आलेल्या लॉकडाऊन मुळे सर्व शाळा महाविद्यालये आणि विद्यापीठे बंद करण्यात आली होती. मुलांच्या परीक्षांचा काळ होता तो..! काही दिवस करता करता लॉकडाऊनचा कालावधी वाढतच गेला आणि तेव्हा मुलांच्या शिक्षणाचं कसं होईल? हा प्रश्न शिक्षण क्षेत्राला तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांना भेडसावायला लागला. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही बाब गंभीर स्वरूपाची होती. त्यामुळे पाल्यांच्या शिक्षणाचा प्रश्न पालकांसमोर 'आ' वासून उभा होता. महाविद्यालय व शैक्षणिक संस्था बंद पडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले हे नुकसान भरून काढण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये व त्यांना शिक्षणाच्या हक्का पासून वंचित रहावे लागू नये म्हणून आणि ही मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहा बाहेर फेकली जाऊ नयेत म्हणून या काळात निर्माण झालेल्या या समस्यांवर तोडगा म्हणून व काळाची गरज म्हणून अनेक शिक्षण पद्धतींचा आपल्याला आपल्या शिक्षण क्षेत्रात नव्याने स्वीकार करावा लागला. कोविड-19 विषाणूने जगभरात कार्य संस्कृती पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. शिक्षण क्षेत्रावर दाटलेले हे गडद संकट दूर करण्यासाठी उपाय योजना म्हणून कोरोना काळात विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा नवा ट्रेंड सुरू झाला आहे. प्राथमिक शाळां पासून ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन वर्ग सुरू करण्यात आले आहेत. अगदी परीक्षा ही ऑनलाइन घेण्यात आल्या सरकारीस्तरावर ही या प्रक्रियेला हिरवा कंदील मिळाला आहे. सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना डिजिटल प्लॅट फॉर्मद्वारे शिकवण्यास सुरुवात केली आहे. काही महाविद्याल यांमध्ये

निष्कर्ष:-

1. पारंपारिक शिक्षण पद्धतीत कोरोना महामारीच्या काळात अमुलाग्र बदल झालेला आहे.
2. कोरोना संसर्ग वाढल्यामुळे ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा पर्याय स्वीकारण्यात आलेला आहे.
3. ऑनलाइन शिक्षण पद्धतीमुळे ज्ञानदानाची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवणे शक्य झाले आहे.
4. भारतात ऑनलाईन शिक्षण पद्धती विद्यार्थी व शिक्षक यांना काही प्रमाणात उपयुक्त ठरलेली आहे.
5. ऑफलाइन शिक्षण पद्धती बरोबरच ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या आवश्यक असे ज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग सुकर होतो.
6. भारतात ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा विकास करण्यासाठी मूलभूत सुविधा अपूर्ण आहेत. या सुविधांच्या निर्मितीवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ:-

1) https://hi.vikaspedia.in/education/education दिनांक-9/1/2022
2) https://www.orfonline.org/marathi/bended-learning-is-future-of-education-68296/?ampदिनांक- 8/1/2022
3) https://www.google.com/amp/s/maharashtratimes.com दिनांक- 8/1/2022
4) राष्ट्रीयशिक्षणधोरण 2020
5) https://marathivishwakosh.org/6206/दिनांक- 7/1/2022
6) https://www.esakal.com/saptarang/learning-home-new-concept-due-corona-292077 दिनांक- 7/1/2022
7) https://en.unesco.org/news/unesco-launches-2021-state-education-report , oct 2021

तर पन्नास टक्के विद्यार्थी क्षमतेनेव 50 टक्के शिक्षक क्षमतेने तसेच कोरोना प्रतिबंध कलसीच्या दोन मात्रा घेतलेल्यानाच प्रवेश देऊन ज्ञान दानाचे कार्य चालत आहे. तर काही महाविद्यालयांमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांसाठी ऑफ लाईन वर्ग व अनुपस्थित विद्यार्थ्यांसाठी ऑन लाइन वर्ग अशा 'ब्लेंडिंगलर्निंग' म्हणजे संमिश्र पद्धतीने शिकविण्याचे कार्य चालू आहे. परंतु त्यासाठी बऱ्याच समस्यांचा सामना विद्यार्थी व शिक्षकांना करावा लागत आहे. या सर्व गोष्टींचा भारतीय तसेच जागतिक शिक्षण व्यवस्थेवर काय परिणाम होईल? covid-19 च्या प्रभावात शिक्षण व्यवस्थेत स्वीकारलेले हे बदल कितपत फायदेशीर ठरतील? या प्रश्नांची उत्तरे आपणास येणाऱ्या काळात मिळणारच आहेत.

भारताचा विचार करता भारतातील 60 % पेक्षा अधिक जनता ही खेड्या पाड्यांमध्ये व ग्रामीण भागांमध्ये वास्तव्यास आहे. शहरांपासून दूरच्या खेड्यांमधील विद्यार्थ्यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसणे किंवा खराब असणे तसेच अँड्रॉइड सेल फोन नसणे तसेच विजेची सोय उपलब्ध नसणे अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. एक वेळ स्वस्त अँड्रॉइड फोन पालक घेतील ही पण त्यात इंटरनेट आलेच नाही किंवा नीटसे आले नाही तर कशाचाच उपयोग नाही. अनेक दुर्गम भागात खेड्या पाड्यांमध्ये, वाड्या-वस्त्यांवर विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना यासमस्यांचा जिकीरीने सामना करावा लागत आहे. परंतु त्यास दुसरा पर्याय नसल्याने त्यांचा सामना करून ऑफ लाइन व ऑन लाइन पद्धतींचा योग्य मेळ साधून या संमिश्र शिक्षण व्यवस्थेची मुळे रुजविणे गरजेचे आहे. कारण हीच काळाची हाक आहे व भविष्यात हिच नव्याने उदयास येणारी व्यवस्था महत्त्वाची शिक्षण पद्धती ठरेल असे आजचे चित्र आहे. कोविड-19 विषाणूच्या वाढत्या प्रभावामुळे वारंवार महाविद्यालय सुरु बंद करण्याचे निर्णय शासनाला घ्यावे लागत आहे महाविद्यालय नियमित पणे सुरू करण्या योग्य परिस्थिती कधी निर्माण होईल हे आज तरी सांगणे कठीण आहे आणि झालीच तरी सामाजिक अंतराविषयीचे (social distencing) नवे नियम कसे असतील? ते पाळून महाविद्यालय सुरू करता येतील का? या विषयी ही भाष्य करणे सध्या कठीण आहे. तूर्तास शासनाने ऑन लाइन वर्ग घेण्यास परवानगी दिली आहे. अनेक महाविद्याल यांनी त्याविषयीचे उत्कृष्ट नियोजन ही केले आहे. म्हणतात ना की, "Every problem has a solution" म्हणजेच प्रत्येक समस्येला उत्तर असते ते उत्तर शोधून सर्व समस्यांवर मात करून शिक्षकांनी ही संगणक वायरलेस इंटरनेट किंवा अभ्यासासाठी योग्य ठिकाण या सुविधां शिवाय विद्यार्थ्यांना अध्यापनाचे कार्य कसे करता येईल या विषयी समर्पक विचार करून अभ्यास क्रमाची रचना करण्याचे प्रयत्न करणे ही काळाची गरज बनली आहे. दुरुस्थ शिक्षण (distance learning) पद्धतीचा अवलंब ही महत्त्वाची बाब आहे. दुरुस्थ शिक्षण म्हणजे फक्त ऑनलाइन शिक्षण नाही तर संमिश्र माध्यमातून शिक्षण देणे होय अशा प्रकारच्या शिक्षणाचे उद्दिष्ट टी व्ही, रेडिओ आणि लघु संदेश सेवा यांच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविणे हे असते. टीव्ही द्वारे मुलांना शिक्षण देण्याच्या प्रक्रियेला पश्चिम बंगाल सारख्या काही राज्यांमध्ये सुरुवात देखील झाली आहे. सर्वराज्यांच्या सरकारांनी असा निर्णय घेणे व त्याविषयीची गांभीर्याने दखल घेणे सुद्धा गरजेचे आहे. त्याविषयीची समर्पक व उत्कृष्ट धोरणे आखली जाणे महत्त्वाचे आहे. व ती आखताना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण क्षेत्रातील उपाय योजना सादर करणाऱ्या (एड-टेक सोलुशन प्रोव्हायडर) संस्थांना पूर्ण मोकळीक देऊन कार्य करण्यास प्रोत्साहन द्यावे. तसेच धोरणे आखताना सर्जनशीलता, शैक्षणिक स्वातंत्र्य, सर्वसमावेशकता आणि राजकीय हस्तक्षेपास बंदी अशा घटकांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

निष्कर्ष:-

1. पारंपारिक शिक्षण पद्धतीत कोरोना महामारीच्या काळात अमुलाग्र बदल झालेला आहे.
2. कोरोना संसर्ग वाढल्यामुळे ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा पर्याय स्वीकारण्यात आलेला आहे.
3. ऑनलाइन शिक्षण पद्धतीमुळे ज्ञानदानाची प्रक्रिया निरंतर सुरु ठेवणे शक्य झाले आहे.
4. भारतात ऑनलाईन शिक्षण पद्धती विद्यार्थी व शिक्षक यांना काही प्रमाणात उपयुक्त ठरलेली आहे.
5. ऑफलाइन शिक्षण पद्धती बरोबरच ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या आवश्यक असे ज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग सुकर होतो.
6. भारतात ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा विकास करण्यासाठी मूलभूत सुविधा अपूर्ण आहेत. या सुविधांच्या निर्मितीवर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ:-


1) https://hi.vikaspedia.in/education/education दिनांक-9/1/2022
2) https://www.orfonline.org/marathi/bended-learning-is-future-of-education-68296/?ampदिनांक- 8/1/2022
3) https://www.google.com/amp/s/maharashtratimes.com दिनांक- 8/1/2022
4) राष्ट्रीयशिक्षणधोरण 2020
5) https://marathivishwakosh.org/6206/दिनांक- 7/1/2022
6) https://www.esakal.com/saptarang/learning-home-new-concept-due-corona-292077 दिनांक- 7/1/2022
7) https://en.unesco.org/news/unesco-launches-2021-state-education-report , oct 2021